## प्रेस नोट

| | |
|---|---|
| युनिटचे नाव | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,बुलडाणा |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | आलोसे श्री.मंगेश जगन्नाथ जोशी, वय ३६ वर्ष, पद—कनिष्ठ लिपीक, नेमणुक सईबाई मोटे सामान्य रुग्णालय,शेगांव, ता.शेगांव, जि. बुलढाणा |
| लाच मागणी | ४०,०००/—रुपये |
| लाच स्विकारली | ४०,०००/— रुपये |
| घटनास्थळ | सईबाई मोटे, सामान्य रुग्णालयातील, प्रशासकीय कार्यालयात, शेगांव ता. शेगांव जि. बुलढाणा |
| घटना तारीख | ०७.१२.२०२३ |

**थोडक्यात हकीकत** :—यातील तक्रारदार यांचा आश्वासीत प्रगती योजनेच्या फरकाचे बिल अदा करण्यासाठी कार्यालयीन आदेश तयार करून त्यावर वैदयकीय अधिक्षक यांची सही घेऊन लेखा विभागाकडे पाठविण्यासाठी यातील आलोसे श्री.मंगेश जगन्नाथ जोशी,पद कनिष्ठ लिपीक, नेमणुक सईबाई मोटे सामान्य रुग्णालय, शेगांव, ता.शेगांव, जि. बुलढाणा हे ४०,०००/— रुपये लाचेची मागणी करित असल्याबाबत तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बुलडाणा घटकाकडे केली होती.

त्यानुसार दिनांक ०२.११.२०२३ रोजी लाचमागणी पडताळणी कार्यवाही आयोजीत केली असता, लोकसेवक श्री.मंगेश जगन्नाथ जोशी, पद कनिष्ठ लिपीक, नेमणुक सईबाई मोटे सामान्य रुग्णालय, शेगांव यांनी तक्रारदार यांचेकडे ४०,०००/— रुपये लाच मागणी करुन सदर लाच रक्कम तक्रारदार यांच्या नोव्हेंबर महीन्याच्या पगारासोबत बिलाची रक्कम जमा झाल्यानंतर स्वीकारणार असल्याचे सांगीतले. त्यानुसार तक्रारदार यांचा नोव्हेंबर महीन्याचा पगार झाल्याने आलोसे यांनी तक्रारदार यांना लाच रक्कम घेवुन बोलावल्याने आज दिनांक ०७.१२.२०२३ रोजी सापळा कारवाई आयोजीत केली असता. आलोसे यांना तक्रारदार यांचेकडुन ४०,०००/— रुपये लाच रक्कम स्वीकारतांना रंगेहात पकडण्यात आले आहे. त्यावरून त्यांचे विरुद्ध पोलीस स्टेशन शेगांव शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदर कार्यवाही :— १.मा.श्री.मारुती जगताप, पोलीस अधिक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती, परिक्षेत्र अमरावती

२.मा.श्री.देविदास घेवारे,अप्पर पोलीस अधिक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती, परिक्षेत्र अमरावती

यांचे मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी श्रीमती शितल घोगरे, पोलीस उपअधिक्षक, पोलीस निरीक्षक सचिन इंगळे, एएसआय/भांगे, पोहेकॉ/प्रविण बैरागी, पोना/विनोद लोखंडे, जगदीश पवार, मपोकॉ/स्वाती वाणी, चानापोकॉ/नितीन शेटे अँन्टी करप्शन ब्युरो, च्बुलडाणा यांनी पार पाडली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत अँन्टी करप्शन ब्यरो बुलडाणा. कार्यालय दुरध्वनी क्रमांक ०७२६२—२४२५४८ व ९६५७०६६४५५ तसेच टोल फ्रि क्रमांक १०६४ यावर संपर्क साधण्याचे आवाहन पोलीस उपअधिक्षक,अँन्टी करप्शन ब्युरो,बुलडाणा यांनी केले आहे.

( श्रीमती शितल घोगरे )
पोलीस उपअधिक्षक,
अँन्टी करप्शन ब्यरो बुलडाणा

Scanned with CamScanner